# २८ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

प्रिय पक्षीमित्र ,

आपणांस कळविण्यात आनंद होतो कि यंदाचे २८वे 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन' पुणे येथे आयोजित करण्यात येत आहे. नेचरवॉक चॅरिटेबल ट्रस्ट व्दारा आयोजित महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन दि. १७ व १८ जानेवारी २०१५ रोजी पुणे येथील महात्मा फुले वस्तु संग्रहालय, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ येथे आयोजित करण्यात आले आहे. २८वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचे उद्घाटन **मा. श्री. श्रीनिवासजी पाटील मा. राज्यपाल, सिक्कीम** यांच्या शुभहस्ते, पद्मभूषण जेष्ठ पर्यावरण तज्ञ **डॉ. माधव गाडगीळ** व २८व्या पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष व **जेष्ठय पक्षीतज्ञ मा. डॉ. संजीव नलावडे** यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

जास्तीत जास्त निर्सगप्रेमी, पक्षी अभ्यासक मित्रांनी सहभागी होण्यासाठी खाली नावे दिलेल्या व्यक्तींशी अथवा नमूद केलेल्या इमेल वर संपर्क साधावा. ज्या पक्षीमित्रांना सादरीकरण करायचे आहे (कालावधी १२+ ३ मिनीटे) त्यांनी आपल्या सादरीकरणाचा विषय व थोडक्यात माहिती दि. २ जानेवारी २०१५ पर्यंत सोबत जोडलेल्या अर्जासहीत खालील नमूद पत्यावर अथवा इमेलने पाठवावी.

संमेलनासाठी आपणांकडून पाठविण्यात आलेल्या सादरीकरणाच्या माहितीचे निवड करण्यासाठी तज्ञांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीने मान्य केलेल्या व निवड केलेल्या पक्षीमित्रांनाच सादरीकरण करता येईल. सादरीकरणासाठी निवडलेल्या पक्षीमित्रांना दि. ७ जानेवारीपर्यंत पूर्वसूचित करण्यात येईल. इतर इच्छुक सहभागी पक्षीमित्रांनीदेखील दि. ७ जानेवारी २०१५ पर्यंत नोंदणी अर्ज भरून आमचेकडे पाठवावेत.

पक्षीमित्र संमेलनाचे सविस्तर वेळापत्रक महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन संघटनेच्या संकेतस्थळावर (www.pakshimitra.org) अथवा नेचरवॉक चॅरिटेबल ट्रस्टच्या संकेतस्थळावर (www.naturewalktrust.org/pakshimitra.com) दि. ७ जानेवारी २०१५ रोजी जाहीर करण्यात येईल.

आपले विश्वासू,

**भाऊ काटदरे**
अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र
९३७३६१०८१७

**अनुज खरे**
विश्वस्त, नेचरवॉक चॅरिटेबल ट्रस्ट
८००७९७६३३७

महाराष्ट्र पक्षीमित्र समेलनासाठीचा नोंदणी अर्ज वरील दोन्ही संकेतस्थळी उपलब्ध आहे.